# प्रेस नोट दि. ३०/०७/२०१९

## अनेक वाहने चोरणारी व त्यांची बनावट कागदपत्रे बनवुन त्या वाहनांची विक्री करणारी टोळी युनिट-५,गुन्हे शाखा पथकाने केली जेरबंद.

### आरोपींनी ४०-४५ वाहनांची चोरी केल्याची दिली कबुली, २७ मोटर सायकल हस्तगत.

युनिट-५ कडील पो.हवा.अमजद पठाण यांना मिळालेल्या बातमीवरुन पुणे शहरातुन दुचाकी वाहनांची चोरी करुन त्याचेवर बनावट नंबर टाकुन त्या नंबरचे आर.टी.ओ.चे बनावट कागदपत्र बनवून शहरात व इतरत्र महाराष्ट्रात सदरची वाहने विकणारी टोळी दि.२९/०७/२०१९ रोजी रात्री १७.०० वा.चे सुमारास काळे पडळ, हडपसर पुणे या ठिकाणी येणार असल्याची खात्रीशिर माहीती मिळाली होती. त्यानुसार युनिट-५ कडील ३ अधिकारी यांच्या वेगवेगळया टिम तयार करुन काळे-पडळ, जवळील परिसरात सापळा लावण्यात आला होता. सायं १७/३० वा. चे दरम्यान पोउनिरी शेंडगे, पो.हवा.पठाण, पो.ना.जोगदंडे,पो.ना.घाडगे यांनी मिळालेल्या माहीतीचे वर्णनाप्रमाणे इसम नामे १) शुभम विनोद भंडारे, वय-२५, धंदा-मजुरी, सध्या रा. वैदयवाडा, मोरे हॉस्पीटलच्या बाजुला, कालिकादेवी मंदिराचे पाठीमागे, राघवेंद्र कॉलनी, जुना औसा रोड,लातुर मुळ गाव- भंडारे वाडा,सिव्हील हॉस्पीटल शेजारी, शास्त्रीनगर, परभणी २) चेतन रविंद्र हिंगमिरे, वय -२६, धंदा-मजुरी,सध्या रा.पहिलवान जिम समोर, म्हसोबा कॉलनी, काळे पडळ, हडपसर पुणे मुळ गाव-हिंगमिरेवाडा, गुरुवार पेठ, गणपती मंदिरासमोर, तासगांव जि.सांगली हे नंबर नसलेल्या बुलेट वरुन येत असताना त्यांना ताब्यात घेतले. बुलेटच्या चॅसिस नं. व इंजिन नं वरुन सरकारी ॲप वाहन च्या आधारे सदर वाहनाबाबत खात्री केली असता ती मोधा पोलिस स्टेशन, परभणी येथुन चोरली असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी अशा प्रकारचे अनेक गुन्हे केल्याचे कबुल केले आहे. त्यांच्या अंगझडती मध्ये गाडयांचे बनावट तयार केलेले कागदपत्र (आर.सी.बुक) मिळुन आले. त्याची खात्री केली असता ते बनावट असल्याचे निष्पन्न झाले आहे. आजपावेतो तपासामध्ये एकुण- २७ मो.सा. कि.रु. **अं. ०९,६५,०००/- चा** मुददेमाल हस्तगत करण्यात आल्या असुन अटक आरोपींनी त्यांच्या इतर दोन साथीदारांची नावे सांगितली असुन त्यांना लवकरच अटक करीत आहेत. अटक आरोपींनी दिलेल्या माहितीवरुन त्यांनी ४० ते ४५ दुचाकी वाहने चोरल्याचे कबुल केले असुन सदरची उर्वरीत वाहने लातुर,परभणी,नांदेड,मुखेड,या भागात विक्री केली असल्याचे कबुल केले आहे लवकरच टिम पाठवुन सदरची वाहने हस्तगत करणार आहोत.

**गुन्हा करण्याची पध्दती-**

यातील अटक आरोपी क्र.१ व २ व त्यांचे अजुन दोन पाहिजे साथीदार हे मोटर सायकल चोरण्याचे काम करीत होते.तसेच यातील अटक आरोपी क्र.२ हा त्या चोरलेल्या गाडयांचे बनावट कागदपत्रे बनविण्याचे काम करीत होता तसेच सर्वजण मिळेल त्या संधी प्रमाणे जुजबी किमतीमध्ये वाहने विकत होते. काही वाहने चोरुन त्यांनी उधारीवर पैसे घेवुन पैसे परत देण्याच्या खात्रिकरीता वाहने संबंधित लोकांकडे ठेवली असल्याची माहिती मिळाली आहे.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे,पुणे शहर श्री.अशोक मोराळे, मा.पोलीस उप-आयुक्त गुन्हे,पुणे शहर श्री.बच्चन सिंह, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे-२, पुणे शहर श्री.भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनाखाली युनिट-५ प्रभारी अधिकारी वपोनिरी.श्री.दत्ता चव्हाण,सपोनिरी.भालचंद्र ढवळे,सपोनिरी.संतोष तासगांवकर,पोउनिरी.सोमनाथ शेंडगे,पो.हवा.संतोष मोहिते,प्रदिप सुर्वे,अमजद पठाण,प्रविण शिंदे,राजेश रणसिंग,दत्ता काटम,राजाभाऊ भोरडे,संजय देशमुख,केरबा गलांडे,महेश साळवी,सचिन घोलप,पो.ना.प्रमोद गायकवाड,अंकुश जोगदंडे,महेश वाघमारे,दया शेगर,प्रविण काळभोर,प्रमोद घाडगे, संजयकुमार दळवी यांनी केलेली आहे.

